# आम्ही भारतीय लोक

**“राज्यघटनेच्या रक्षणासाठी उभे राहा #सुधारित नागरिकत्व कायदा 2019 रद्द करा #एनआरसी ला नकार**

आम्ही भारतीय लोक आमच्या नागारिकत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या हालचालीचा निषेध करतो. धार्मिक आधारावर भारताची फाळणी करण्याचा हा प्रयत्न असल्याचे आम्ही मानतो. आम्हाला कायदा आणि संविधानाने आमचे नागरिकत्व दिलेले आहे आणि त्याचं रक्षण करण्यासाठी आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत निकराने लढा देऊ.

भारतीय राष्ट्राची संकल्पना आणि नागरिकत्व याच्या पायावरच घाला घालणाऱ्या स्पष्ट राजकीय हालचाली गेली सहा वर्ष चालू आहेत. एक म्हणजे नुकताच राष्ट्रपतींनी संमत केलेला सुधारित नागरिकत्व कायदा 2019, आणि दुसरी म्हणजे कोणत्याही चर्चेविना राष्ट्रीय नागरिक नोंदणीची देशभर घाईघाईत राबवली जाणारी प्रकीया या सध्याच्या दोन विशेष हालचाली याचाच भाग आहे. आसाम मधल्या जनतेच्या नागरिकत्वावर गेली अनेक दशके हल्ले होत आहेत. सरकार सुधारित नागरिकत्व कायद्याच्या आधारे एकीकडे भारतीयांच्या एका गटाला एन आर सी पासून वाचवलं जाईल असं आश्वासन देतो तर दुसरीकडे आसामी आणि भारतीय मुसलमान या भारतीय गटाला सरळ सरळ लक्ष्य करत आहे.

एकदा ही प्रकीया सुरु झाली कि त्याचा त्रास आणि हल्ल्यापासून कोणीही वाचणार नाही. भारतातील विस्थापित कामगार, लहान शेतकरी,आदिवासी आणि जंगल निवासी, दलित–बहुजन बहुसंख्य या सर्व असंविधानिक प्रक्रियेला बळी पडणार आहेत. अनेक प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या, मानवनिर्मित संकटांमुळे (दंगली

आणि मानवी संहार), नैसर्गिक आपत्ती (पूर, आग, भूकंप आणि याहून भयंकर) यामुळे विस्थापित झालेले भारतीय शहरांमध्ये राहणारे हजारो लोकांकडे या चुकीच्या पद्धतीने रचलेल्या डावाचं समाधान करू शकेल अशी त्यांच्या जन्मसंबंधी जमीन/घर नोंदणीची कागदपत्रे नाहीत.

आपल्याला आता # सुधारित नागरिकत्व कायदा 2019 रद्द करा # एनआरसी नको ही मागणी केली पाहिजे!

## काय आहे सुधारित नागरिकत्व कायदा 2019?

राज्यघटनेच्या कलम 11 नुसार पारित झालेल्या नागरिकत्व कायदा, 1955 प्रमाणे जन्माने, नैसर्गिकपणे, नोंदणी करून आणि सामील करून नागरिकत्व देण्यात येते. 1950–1987 या काळात भारतात जन्माला आलेल्या व्यक्ती भारतीय नागरिक असेल. 1987 नंतर त्या व्यक्तीच्या जन्माबरोबर त्यांचे आई किंवा वडील यांचा जन्म भारतात झालेला असावा, 2004 नंतर दोन पैकी एक पालक भारतीय असला पाहिजे पण अन्य पालक बेकायदेशीर विस्थापित नसावा.

सुधारित नागरिकत्व कायदा 2019 पाकिस्तान, अफगणीस्तान आणि बांग्लादेश या तीन इस्लामिक राष्ट्रातून छळ झाल्यामुळे 2014 किंवा नंतर भारतात आलेले शरणार्थी यांची नागरिकत्व देण्याचे आश्वासन दिलं आहे. या तीन देशातील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारसी आणि ख्रिश्चन यांना विशेष अधिकार देण्यासाठी कायद्यात सुधारणा करून मुसलमानांना जाणीवपूर्वक वगळण्यात आलं आहे. उदा – अहमदिया किंवा सुफी किंवा राजकीय असंतुष्ट ज्यांचा पाकिस्तानमध्ये नि:संशय छळ होते आहे किंवा म्यानमार मधील रोहिंग्या किंवा श्रीलंकेतून आलेले तामिळ शरणार्थी यांचा या सुधारणेत उल्लेख केलेला नाही.

केवळ काही धर्माच्या व्यक्तींना विशेष अधिकार देण्याबरोबर इतर धर्मियांना, मुसलमानांना दुय्यम स्थान देण्याचा हा पहिल्यांदा कायदेशीर प्रयत्न होत आहे. सुधारित नागरिकत्व कायदा 2019 धर्मनिरपेक्ष तत्वांचं आणि राज्यघटनेतील कलम 13, 14, 15 या समानतेचा अधिकार, कायद्यापुढे समानतेचा अधिकार आणि सरकारकडून भेदभावपूर्ण वागणूक न मिळण्याच्या अधिकारांचं उल्लंघन करत आहे.

सुधारित नागरिकत्व कायदा 2019 दृकाहीही म्हणत असेल तरी सरकार हिंदी,

मराठी, गुजराती किंवा तामिळ भाषिक हिंदूंना नागरिकत्व देऊ शकणार नाही कारण ते पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा बांगलादेशातून स्थलांतरित झाले आहेत हे कसे सिद्ध करू शकतील?

## आसाममधील राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी)

1951 च्या जनगणनेनुसार आसाममध्ये प्रथम राष्ट्रीय नागरिक नोंदणी दस्तावेज तयार करण्यात आला. आसाममधील भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्य गेली अनेक दशकं 'परकीय', 'परदेशी' आणि 'बेकायदेशीर स्थलांतरीत' संबोधले जाण्याच्या सावटाखाली जगत आहेत. आसाममधील 'परप्रांतीयांची समस्या ब्रिटिशांनी आसाममध्ये शेती करण्यासाठी जंगल कापण्यासाठी गरीब बंगाली मजूर आणले तेव्हापासून शेकडो वर्षं जुनी आहे. फोडा आणि राज्य करा या धोरणानुसार ब्रिटीशांनी स्वतरूच त्यांच्यातल्या दुहीला आणि हिंसेची आग भडकावली. त्यातूनच परप्रांतीयांविरुद्ध मोठ्या चळवळी झाल्या, व्यापक हिंसाचार आणि दंगली घडल्या आणि त्याची परिणीती म्हणून  परकीयांना शोधून काढण्याच्या समांतर आणि परस्परविरोधी अधिकृत कारवाया जन्माला आल्या.

अनेक वर्षांच्या हिंसाचारात हजारो लोक मारले गेले आणि 1985 च्या आसाम करारावर स्वाक्षऱ्या करून नागरिकांची नोंदणी करून राष्ट्रीय नागरिक नोंदणी अद्ययावत करण्याचा मार्ग खुला झाला. या दस्तावेजामुळे आसाममध्ये शांतता नांदेल आणि आसाममध्ये कोण भारतीय आहेत आणि कोण परकीय या प्रश्न कायमचा सुटेल असं मानलं गेलं. सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली तयार होणारी  एन आर सी ही आसामी जनतेचा सर्वात व्यापक पाठींबा असेलेली एकमेव प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत विद्यार्थी संघटना, नागरिकांचे गट, राजकीय पक्ष या सर्वांचा एन आर सी ची प्रक्रिया आणि त्यासाठी कोणती कागदपत्रं लागतील आणि कशी वापरली जातील हे ठरवण्यात सहभाग असल्याने हे शक्य झालं आहे.

तरीही अंतिम राष्ट्रीय नागरिक नोंदणीबाबत सगळेच असंतुष्ट आहेत. "निष्पक्ष आणि सर्वसमावेशक" होण्याऐवजी या प्रक्रियेमुळे आसामी जनतेला मानसिक धक्का बसला आहे. कंगाल केले आहे. ही यादी पूर्ण करण्यासाठी पाच वर्षं लागली असून त्यावर १२२० कोटी रुपये खर्च झाले आहेत. आणि 31 ऑगस्ट 2019 रोजी जाहीर झालेल्या अंतिम यादीमध्ये 19 लाख लोक वगळले आहेत. त्यापूर्वी वेगवेगळ्या टप्प्यांवर अर्ज केलेल्या 32 कोटी लोकांपैकी पहिल्यांदा 12 कोटी, आणि नंतर 44

लाख व्यक्तींना वगळण्यात आलं होतं. वेगवेगळ्या भागीदारांबरोबर सविस्तर प्रणाली तयार करूनही, राजकीय प्रवाह बदलल्यानंतर ज्या प्रकारे प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यात आला त्यामुळे ज्या कागदपत्रांना मान्यता दिली होती ती नाकारण्यात आली आणि हजारो भारतीय बंगाली हिंदू, गोरखा, हिंदी भाषिक आणि राजवंशी, मुसलमान सर्वच वगळले गेले!

सिटीझन फॉर जस्टीस अँड पीसने (cjp.org.in) दोन वर्षं स्वयंसेवकांच्या माध्यमातून आसाममध्ये 10 लाख लोकांना एन आर सीचे अर्ज भरण्यासाठी मदत, बांधक छावण्यामधून मुक्तता, आत्महत्या करू पाहणाऱ्या नागरिकांचं समुपदेशन आणि सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करावा यासाठी अर्ज केले आहेत. आसाममध्ये 700 स्वयंसेवकांच्या माध्यमातून मिळालेल्या प्रत्यक्ष जमिनीवरच्या अमुल्य अनुभवाचा वापर करून आम्ही अखिल भारतीय राष्ट्रीय नागरिक नोंदणीसाठी साहित्य तयार करण्यासाठी आणि प्रशिक्षण देण्यासाठी आता प्रयत्न करीत आहोत!

## देशव्यापी एनपीआर – एनआरसी

भारतीय राज्यघटनेने या देशातील नागरिकाना बहाल केलेल्या नागरिकत्वाच्या मूलभूत हक्काच्या परिप्रेक्षातून एनपीआर – एनआरसीला विरोध करण्याची भूमिका पुढे आली आहे. सुधारित नागरिकत्व कायदा 2019 आणि येऊ घातलेले देशव्यापी एनपीआर–एनआरसी मागील राजकीय उद्देश ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या धोरणा प्रमाणे असल्याचे दिसते.

एकदा का आपण कागदपत्रांच्या आधाराने कोण भारतीय आहेत आणि कोण नाहीत हे ठरवण्याची सूत्रे प्रशासकीय यंत्रणा आणि सरकार यांच्या स्वाधीन केली तर सामजिक तणाव आणि मानसिक धक्के यांच्या दूरगामी संघर्षासाठी आपण दारे मोकळी करून देत आहोत हे समजून घेतले पाहीजे.

### 1. देशव्यापी एनआरसीची गरज का?

देशात नेमके कितीजण बेकायदेशीर वास्तव्य करीत आहेत याबाबतचे कोणत्याही प्रकारचे समग्र सर्व्हेक्षण झालेले नाही. त्यामूळे अधिकृत आकडेवारी उपलब्ध

नसताना एन आर सी कशावर आधारित असेल? पूर्वी आमच्याकडे रेशन कार्ड होती. आता आधार कार्ड आहेत. त्यामूळे आता भारतीयाना आणखी एका प्रक्रियेतून का ढकलले जात आहे?

## 2. यासाठी कोणती कागदपत्र लागणार?

या देशातील फक्त 58 टक्के जन्मांची नोंद होते, 20 टक्के मुले शाळेत जाऊ शकत नाहीत, 30 टक्के लोकसंख्या पोटासाठी देशांतर्गत स्थलांतरित होत असते अशा परिस्थितीत कागदपत्र खूप दुर्मिळ असतात. तुम्ही 40–50 वर्षापुर्वीचा तुमचा जन्माचा दाखला किवा पूर्वजांच्या वास्तव्य कसे सिध्द करणार? विशेषतरू विवाहित महिलांना अपुऱ्या कागदपत्रांमुळे खूप संघर्ष करावा लागतो. अशावेळी करोडो भारतीयाना कागदपत्रे मिळवण्यासाठी सरकारी कार्यालये, रुग्णालये, जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय केंद्रे यापुढे रांगा लावून उभे राहावे लागले तर केवढा गोंधळ निर्माण होईल याची कल्पनाही करता येते. आसाम प्रमाणे आपण सारे कागदपत्रांसाठी रांगेत उभे राहू, सरकारी कार्यालयांमध्ये चकरा मारू आणि पुढील अनेक वर्षे सरकार याशिवाय काहीच करू शकणार नाही.

## 3. यासाठी कोणती कालमर्यादा (Cut of date) असेल?

तुम्ही किवा तुमचे पूर्वज जेव्हापासून भारतात राहात तो दिवस! आसाममध्ये ही कालमर्यादा 1971 साल ठरवण्यात आली होती. संपूर्ण भारतासाठी ही मर्यादा 1987 असेल किवा 1950 ही. आणि तेवढे मागे जाऊन 50–60 वर्षांच्या वास्तव्याचा पुराव्याची कागदपत्रे सगळ्यांना शोधून द्यावी लागणार!

## 4. यासाठी येणाऱ्या खर्चाचे काय?

आर्थिक मंदीच्या वणव्यात देश होरपळत असताना आपण याचा विचार करीत आहोत. गेल्या 40 वर्षातील सर्वाधिक बेरोजगारीचा दर 2019 साली आपण अनुभवत आहोत. आत्ता तर फक्त कांद्याचे भाव वाढले आहेत. पुढील परिणामांची ही तर सुरुवात आहे. एकट्या आसाममध्ये 3.20 कोटी नागरीकांच्या नागरिकत्व सर्व्हेक्षणाचा खर्च 1220 कोटी आला आहे. अनेक कुटुंबाना ही कगदपत्रे मिळवण्यासाठी आपला लहानसहान जमिनीचा तुकडा, घरही विकावे लागले. हा आकडा 44 लाख कुटुंबांसाठी 7,836 कोटींच्या वर गेला! 19 लाख नागरिकाना

वगळण्यात आले ज्यांची रवानगी आसाम बंधक छावण्यांमध्ये करण्यात आली. या सार्‍याचा खर्च 11,82,000 कोटींच्या वर गेला!

भारताची लोकसंख्या 134 कोटी आहे. याचे साधे गणित केले तर आकडा 55 हजार कोटी रुपयांच्या घरात जाणार आहे. भारताच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण खात्याचा खर्च आहे 65 हजार कोटी.

प्रश्न हा आहे की भारताला एवढा खर्च परवडणारा आहे का?

## 5. सरकार आपल्या नागरिकत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकते का?

योग्य छानन्या आणि तपासण्या असताना, केवळ काही कागदपत्रांच्या आधारे 134 कोटी जनतेच्या नागरिकत्वाची तपासणी करण्याचे लोकशाही विरोधी आणि अतिरिक्त अधिकार सरकारी यंत्रणेला देण्यात येणार आहेत. आसाममध्ये याच्याशी संबंधित सर्व घटकांशी (राजकीय पक्ष,नागरी संघटना, विद्यार्थी संघटना इत्यादी) चर्चा करून याच्या अमलबजावणीची रुपरेखा आखण्यात आली होती. देशभरातील प्रक्रीया अशाप्रकारे लोकांशी सल्लामसलत करून पारदर्शी पद्धतीने करण्यात येणार आहे का? आपण लोकशाहीमध्ये राहात नाही का?

## 6. आपल्या नागरिकत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याची सक्षमता सरकारी यंत्रणेमध्ये आहे का?

आपल्या सर्व सरकारी कागदपत्रांमध्ये कितीजणांची नावे अचूक नोंदवण्यात आली आहेत? कोणती शासकीय यंत्रणा लोकांबद्दल सहानुभुती दाखवून काम करते ? भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि अकार्यक्षमता याने पोखरलेल्या आपल्या श्सरकारीश यंत्रणांवर लोकांना नागरिकत्व बहाल करण्याची संवेदनशील जबाबदारी कोणत्या विश्वासाने सोपविण्यात येणार आहे? आसाममधील साकेन अली नामक व्यक्तीला त्याच्या काही कागदपत्रांमध्ये एक अतिरिक्त श्एचश असल्याने बंधक छावणीत रवाना करण्यात आल्याचे उदाहरण आहे. त्याना 5 वर्ष तेथे राहावे लागले. सुब्रोतो डे यांचा तर बंधक छावणीत मृत्यू झाला. देशाचे पाचवे राष्ट्रपती फकृद्दीन अली अहमद यांच्या कुटुंबाला एन आर सी मधून वगळण्यात आले होते. भारतीय लष्कराचे माजी अधिकारी आणि कारगील युद्धसैनिक मोहमद साणुउल्ला यांची

जामिनावर सुटका होण्याआधी बंधक छावणीत रवानगी करण्यात आली होती.

## 7. देशव्यापी एन आर सी मधून तुम्हाला वगळण्यात आले तर काय?

याचे उत्तर फक्त आसामच्या उदाहरणात बघायला मिळते. आसाममध्ये संशयित श्परदेशीश्ना आणि एन आर सी मधून वगळण्यात आलेल्याना श्फॉरेन ट्रीब्युलसश या अर्ध – न्यायिक यंत्रणेकडे सोपविण्यात आले होते. लोक आणि माध्यमांपासून ही यंत्रणा गोपनीय आणि अ पारदर्शक ठेवण्यात आली होती. कोणाला परदेशी ठरवावे आणि कोणाला नाही याचा निर्णय ही फॉरेन ट्रिब्यूनलस मनमानी पध्दतीने घेत. एकेका खटल्यासाठी कित्येक वर्ष लोकाना लढावे लागत आहे. या प्रक्रियेत तुम्ही श्परदेशीश म्हणून जाहीर झाल्यावर तुमची रवानगी बंधक छावण्यांमध्ये होते. तेथे एका कुटुंबातील सदस्यांना एकमेकांपासून अलग ठेवले जाते. त्या छावण्यांमधील निवासाची अमानुष परिस्थिती भयावह आहे. बेकायदेशीर निर्वासितांबाबत भारताचा बांगलादेशासोबत कोणताही करार झालेला नसल्याने बांगलादेशी नसतानाही 70 वर्षीय पार्बती दास यांच्या सारख्या बुजुर्गाना येथे वर्षानुवर्ष खितपत पडावे लागले, आप्तेष्टांपासून अलग राहावे लागले.

## राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एन पी आर)

भारत शासनाच्या म्हणण्यानुसार एप्रिल 2020 ते सप्टेंबर 2020 दरम्यान भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी देशातील प्रत्येक घरापर्यंतचे सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. प्रथमदर्शनी यात कोणताही धोका दिसत नसला तरी, यावर आधारित अखिल भारतीय एन आर सी ठरवण्यात येणार आहे. देशातील प्रत्येक घरापर्यंत होणार्या सर्व्हेक्षणद्वारे या याद्या तयार करण्यात येणार आहेत. एनआरसीच्या या याद्यांमध्ये ज्यांची नावे येणार नाहीत त्या लोकांना त्यांची कागदपत्रे घेऊन जिल्हा प्रशासनाकडे अर्ज करावे लागणार आहेत. त्यावर ते देशाचे नागरिक आहेत किंवा नाही याचा निर्णय जिल्हाप्रशासन घेणार आहे. त्यामूळे, हे सरकारी अधिकारी घरोघरी येतील तेव्हा कोणत्या कागदपत्रांची विचारणा करतील? कोणती कागदपत्रे त्यांचे समधान करू शकतील?

नेहमीप्रमाणे शासनाने नेमकी कोणती कागदपत्रे यात ग्राह्य धरली जाणार आहेत याची सूची जाहीर केलेली नाही. तेव्हा कोणत्या कागदपत्रांची विचारणा होणार आहे? कोणती कागदपत्रे चालणार आहेत? कोणती नाही? हे सर्व्हेक्षण कसे होणार आहे? त्यासाठी कोणते निकष लावले जाणार आहेत?

## भारतीय कोण आहेत?

काही कागदपत्रांची मालकी भारतीयत्व ठरवते का? एखाद्या धर्मात जन्म झाला म्हणून भारतीयत्व ठरते का? इतरांपेक्षा आपली एखाद्या राजकीय विचारसरणीवरील श्रद्धा भारतीयत्व ठरवते का? कोण ठरवणार कोण आहे भारतीय?

शेकडो वर्षांच्या परंपरांचा अभिमान बाळगणाऱ्या, दरएक मैलागणिक भाषा आणि चव बदलणाऱ्या , जगातील सर्वोच्च तत्त्वज्ञानाचा जन्म ज्या मातीत झाला, त्यावर असंख्य वेळा वादविवाद झाले अशा देशातील नागरिकत्व ठरवण्यासाठी या सर्व व्याख्या खुज्या आहेत. भारताची संकल्पना चितारण्यासाठी कोणतीही एकच एक कल्पना संकुचित ठरते आहे. कोणतीही एकांगी व्याख्या कोण भारतीय आहे आणि कोण नाही हे ठरवू शकत नाही.

खालील पत्त्यावर आपला पाठींबा कळवा : cjpindia@gmail.com

किंवा. 7506661171

Twitter : @cjpindia

Instagram : @cjpindia

Facebook : facebook.com/cjpindia